



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२०८ ■ शुक्रवार १ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार नऊ जागा नियमित, एका जागेवर पोटनिवडणूक

**मुंबई, दि. ३० : महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली. विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. मात्र, ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विधान परिषदेच्या दहा जागांसाठी छाननी २ मेस होणार असून मतदान आणि निकाल १२ मेस लावण्याचे नियोजन होते. उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या तीन जणांना सुचक म्हणून दहा आमदारांच्या सह्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे दोन मेस छाननीची प्रक्रिया पूर्ण होऊन निवडणूकीचे सोपस्कार पूर्ण होतील.**



विधान परिषदेच्या दहा जागांसाठीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे निश्चित झाले आहे. कुठल्याही पक्षाने अकरावा उमेदवार दिला नसल्याने विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार आहे. तीन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले असले तरी त्यांना दहा आमदारांची सूचक म्हणून सही मिळाली नाही. परिणामी, संबंधित अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरवले जातील. भाजपकडून सहा, शिवसेनेकडून दोन, राष्ट्रवादी काँग्रेसकडून एक आणि मविआकडून एक उमेदवारांचा अर्ज दाखल झाला आहे. विधान परिषदेच्या या निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत.

भाजपकडून सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार, प्रज्ञा सातव यांना संधी देण्यात आली आहे. शिवसेना शिंदे गटाकडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांना संधी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांना तर शिवसेना ठाकरे गटाकडून महाविकास आघाडी म्हणून अंबादास दानवे यांना संधी देण्यात आली आहे. (पान ४ वर)




– संपादक

### उद्या अंक बंद

**१ मे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिना निमित्त दै.आपला महाराष्ट्र कार्यालयाला सुटी असल्याने उद्या दि.२ मे २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची जाहिरातदार, वाचक व एजंट, विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.**

**–संपादक**

## धार मध्ये पिकअप-स्कॉर्पिओ अपघात सोळा ठार पंचवीस जण गंभीर जखमी


**धार, दि. ३० : मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यात बुधवारी रात्री झालेल्या भीषण अपघाताने राज्य हादरले. चिकलिया फाटयाजवळ पिकअप आणि स्कॉर्पिओच्या धडकेत सोळा जणांना आपला जीव गमवावा लागला. या हृदयद्रावक घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी दुःख व्यक्त केले. सरकारने मोठया आर्थिक मदतीची घोषणा केली असून सर्व जखमींवर मोफत उपचार केले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. त्यांनी इंदूरचे विभागीय आयुक्त आणि आयजींना जखमींच्या वैद्यकीय व्यवस्थेवर स्वतः लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.**



धार मधील भीषण अपघातात अनेक मजुरांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. तर पंचवीसहून अधिक मजूर जखमी झाले. मात्र उपचारादरम्यान आणखी चार मजुरांचा मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा आता सोळावर पोहोचला आहे. मृतांमध्ये (पान ४ वर)

## महानिर्मितीचे संच एकापाठोपाठ एक बंद वीजपुरवठ्यावर ताण, राज्यावर वीज संकट

**नागपूर, दि. ३० : राज्यात वीजेची मागणी वाढलेली असताना तीन दिवसांपूर्वी महानिर्मितीचे तीन वीजनिर्मिती संच बंद पडले होते. त्यापैकी दोन संच सुरू झाल्याने दिलासा मिळत असतानाच आता चंद्रपूर वीजनिर्मिती प्रकल्पातील आणखी दोन संच बंद पडले आहेत. त्यामुळे वीजपुरवठ्यावरील ताण कायम असून अधिकाऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.**



उन्हाळ्यामुळे विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. अशातच कोराडी प्रकल्पातील ६६० मेगावॅटचा संच क्रमांक आठ, नाशिक केंद्रातील २१० मेगावॅटचा संच क्रमांक चार आणि चंद्रपूर केंद्रातील ५०० मेगावॅटचा संच क्रमांक सात बॉयलर ट्यूब गळती आणि तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते. त्यापैकी नाशिक व चंद्रपूर येथील संच पुन्हा सुरू करण्यात यश आले असून कोराडीतील संचाची दुरुस्ती सुरू आहे. दरम्यान, बुधवारी चंद्रपूर प्रकल्पातील २१० मेगावॅटचा संच क्रमांक चार आणि ५०० मेगावॅटचा संच क्रमांक सहा हे सुद्धा बॉयलर ट्यूब गळती वा अन्य तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले आहेत. परिणामी, मागणीच्या तुलनेत वीज पुरवठ्यावर ताण कायम आहे. बुधवारी दुपारी तीन वाजता राज्यातील विजेची मागणी २९ हजार ४९० मेगावॅट इतकी होती. त्यात मुंबईतील तीन हजार ९८० मेगावॅट मागणीचा समावेश होता. ही मागणी (पान ४ वर)

## जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण दत्त.एस यांची बदली

नंदुरबार, दि.३०(प्रतिनिधी)- 



नंदुरबारचे जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण दत्त. एस यांची अपर पोलिस महासंचालक आणि सहाय्यक पोलिस महानिरीक्षक आस्थापन यांचे स्टाफ आफिसर पदावर बदली झाली. एसपी दत्त त्यांच्या जागेवर पुणे लोहमार्ग पोलिस अधिक्षक अश्वीनी सानप यांची नियुक्ती करण्यात आली. पोलिस एसपी श्रावण दत्त.एस यांनी नियुक्ती झाल्यानंतर सर्वप्रथम जुगार अड्डे, मटके व अवैध धंदे बंद केले होते.मात्र काही दिवसानंतर मटका व अवैध धंदे फोफावले. (पान ४ वर)

## ना.जयकुमार रावलांच्या हस्ते जिल्हा क्रीडा, युवा पुरस्काराचे आज वितरण

**धुळे, दि.३०- महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे द्वारा सन २०२५-२०२६ या वर्षासाठी खेळाडु व क्रीडा मार्गदर्शक यांना जिल्हा क्रीडा पुरस्कार व युवक, युवती व संस्थांना जिल्हा युवा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी १ मे २०२६ रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते संबंधिताना प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी दिली आहे.**



क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्यावतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे द्वारा जिल्हयातील खेळाडु, क्रीडा मार्गदर्शक यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या कार्याचे तसेच योगदानाचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व त्यांना क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, याकरिता जिल्हा क्रीडा प्रस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, रोख पारितोषिक १० हजार रुपये असे आहे.

त्याचप्रमाणे जिल्ह्यातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर युवा पुरस्कार हा जिल्हास्तरावर एक युवक व एक युवती तसेच एक नोदंणीकृत संस्था यांना देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, (पान ४ वर)

## पालकमंत्र्यांकडे कचऱ्याची समस्या; शिवसेना

धुळे, दि. ३० (प्रतिनिधी) : पंधरा दिवसापासून धुळे शहरात कचऱ्याच्या संदर्भात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून आंदोलन सुरू आहे. तरीही ठिक-ठिकाणी कचऱ्याचे ढीग जसेच्या तसे पडून आहेत. या संदर्भात महापालितका आयुक्तांनी स्वच्छता निरीक्षक आणि अधिकाऱ्यांना तंबी दिली. तरीही शहराच्या परिस्थिती सुधारणा होत नाही. सर्वत्र पसलेला कचरा आणि दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आयुक्तांनी आदेश वजा सुचना केल्या, पण कचरा संकलन करणारा ठेकेदार जुमानत नाही. (पान ४ वर)



## दुष्काळमुक्तीचा उपाय राबवण्याचे श्रेय शिरपूर पॅटर्नला आहे- ना.विखे पाटील

शिरपूर, दि.२९ (का.प्र.) : महाराष्ट्रात दुष्काळमुक्तीचा उपाय राबवण्याचे श्रेय आमदार अमरीशभाई पटेल यांच्या शिरपूर पॅटर्नला आहे. पाणी अडवणे आणि ते जमिनीत मुरवणे या कार्यपद्धतीतून त्यांनी निर्माण केलेल्या बंधाऱ्यांनी संपूर्ण राज्यात आदर्श घालून दिला आहे. त्याच प्रेरणेतून महाराष्ट्र शासन काम करीत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प केला. त्याची सुरवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दीस्मृतीनिमित्त गोदा ते नर्मदा (पान ४ वर)

## प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी हिमालयासारखा- मंत्री हसन मुश्रीफ

**नंदुरबार, दि.३०(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यामध्ये प्रामाणिकपणे काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हिमालयासारखा पाठीशी उभा आहे, असे वचन महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री व पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. नंदुरबार जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयतक्शील आहे, असेही ते म्हणाले. नंदुरबार जिल्ह्यातील विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही ते म्हणाले.**

नंदुरबार येथील सेंट मदर तेरेसा स्कूलमध्ये नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा मोठ्या उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे होते.

भाषणात मंत्री श्री. मुश्रीफ पुढे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे यांना विधान परिषदेवर संधी मिळावी यासाठी आपण पुढच्या वेळेस नक्की प्रयतक करू. महायुतीतील घटक पक्षावर अन्याय न करता राष्ट्रवादी पक्षाच्या विस्तार करण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याने प्रयतक्शील राहुन काळजी घेईन. पक्ष संघटनासाठी सर्वांनी एकत्रित आणि एक दिलाने काम करा.



मंत्री मुश्रीफ पुढे म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार ज्या पुरोगामी विचारांवर उभी हयात वाटचाल करीत आले, तो पुरोगामी विचार आम्ही कधीही सोडणार नाही. सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना एकत्रित घेऊन नंदुरबार जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढेल, यासाठी (पान ४ वर)

## मो.सायकलची धडक पादचारी महिला ठार

धुळे, दि.३०- धुळे तालुक्यातील बोरविहीर फाटाजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटर सायकलने पायी जाणाऱ्या महिलेला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात पादचारी महिलेचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गणेश जामसिंग गिरासे यांनी दि.२९ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, जळगाव जिल्हा चाळीसगाव येथील प्रतिभा नगरातील रहिवासी मयुर मोहनसिंग राजपूत (वय २५) हा धुळे तालुक्यातील बोरविहिर फाटा जवळून मोटर सायकल क्र.एमएच१८/ (पान ४ वर)

## पाचकंदील येथील लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केटचे आज भूमिपूजन

**धुळे , दि.३०- शहरातील मुख्य बाजारपेठेतील पाच कंदील परिसरात असलेल्या लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केटच्या नूतनीकरणासाठी आज दि.१ मे रोजी सकाळी दहा वाजता भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्या हस्ते हा सोहळा पार पडणार आहे.**

सुमारे शंभर वर्षांपूर्वी उभारण्यात आलेले हे मार्केट कालांतराने जीर्ण झाले होते. अनेक वेळा आग लागण्याच्या घटनांमुळे तसेच इमारतीची मुदत पूर्ण झाल्याने येथील दुकाने मोडकळीस आली होती. त्यामुळे नवीन, सुरक्षित व आधुनिक मार्केटची गरज निर्माण झाली होती. विधानसभा निवडणुकीदरम्यान आ.अनुप अग्रवाल यांनी धुळे शहर अतिक्रमणमुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी पाच कंदील येथे सुसज्ज मार्केट उभारण्याचा (पान ४ वर)

॥ आठवा स्मृतीदिवस ॥

प्रेरणास्थान



कै. श्री हस्तीमलजी जैन

आधारस्तंभ



मानवमित्र, खान्देशरत्न, आमचे प्रेरणास्त्रोत
काकाजी श्री. कांतीलालजी हस्तीमलजी जैन
जन्म- १८-१०-१९४६ निर्वाण- ०२-०५-२०१८
आपण आमच्यात नाही, पण आमच्यात आहात
शरीराने नसाल, पण विचार व प्रेरणेने आहात
करीतो नमन आपणास व आपल्या संस्कारास
समर्पित करीतो सर्व आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्य आपल्या आदर्शास

हस्ती परिवार
दि हस्ती को-ऑप. बँक लि.
An ISO 9001-2015 Certified Bank — Since 1971

बँकेची अद्यावत आर्थिक स्थिती (३१ मार्च २०२६ अखेर)
ठेवी - १२८७.७८ कोटी · कर्ज - ७९८.८४ कोटी · स्वनिधी - २२९.९३ कोटी
नेट एन.पी.ए. 0% (सतत १४ वर्षापासून) · निव्वळ नफा - २४.२७ कोटी

शाखा परिवार: दोंडाईचा, शिंदखेडा, सोनगीर, नंदुरबार, पिंपळनेर, साक्री, धुळे, सटाणा, अक्कलकुआ, शहादा, जळगांव, शिरपुर, नवापुर, चाळीसगांव, अमळनेर, तळोदा, नंदुरबार- तळोदा रोड, देवपूर- धुळे, विसरवाडी, निजामपूर, पुणे- पौडरोड, नाशिक

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट
हस्ती पब्लिक स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, दोंडाईचा · हस्ती वर्ल्ड स्कूल
हस्ती गुरुकुल · हस्ती प्रि-प्रायमरी स्कूल · हस्ती विद्यारंभ सेमी इंग्लिश बालवाडी
हस्ती प्रि-प्रायमरी स्कूल, विद्या कॉलनी · हस्ती फर्स्ट स्टेप · हस्ती पब्लिक इंग्लिश मिडियम होस्टेल
हस्ती बहुउद्देशिय सांस्कृतिक भवन

### अग्रलेख महत्त्वाचा ठरला

## धुळे जिल्ह्या.पोलीस अधीक्षक पदी सिंगुरी विशाल आनंद यांची नियुक्ती

**धुळे, दि.३० - धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक पदी सिंगुर विशाल आनंद यांची नेमणूक करण्यात आली आहे.दै. आपला महाराष्ट्रने मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस रविवारी शिरपूर येथे मुक्कामी असताना ना.देवेंद्रजी फडणवीस यांची तळमळ,जिल्हा पातळीवर जे घडते ते वेगळेच या मथळ्याखाली दिलेला अग्रलेखात जिल्ह्यासाठी चांगल्या पोलीस अधीक्षक द्यावा अशी मागणी केली होती.त्या अनुषंगाने ही बदली झाल्याचे दिसते. या अगोदर बच्चन साहेब धुळ्याला येणार याची बरीच चर्चा झाली होती.**



धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून येणारे सिंगुरी विशाल आनंद हे २०१५ च्या आयपीएस असल्याचे समजते . अमरावती ग्रामीणचे ते पोलीस अधीक्षक होते. दै.आपला महाराष्ट्रने आपल्या अग्रलेखात शासन गुटख्याच्या विरोधात मोहीम उघडते. तर धुळे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात गुटखा राज्यात वितरित होतो, याकडे लक्ष वेधले होते.याच अग्रलेखात इतरही अनेक मुद्दे उपस्थित केले होते. जिल्ह्यात बच्चन नावाचे अधिकारी पोलीस अधीक्षक म्हणून येणार याची मोठी चर्चा यापूर्वी झाली होती. मात्र मुख्यमंत्र्यांच्या लक्षात अनेक बाबी अग्रलेख छापल्यानंतर बच्चन यांच्या धुळे बदलीच्या चर्चे ला पूर्णविराम मिळाल्याचे दिसते. सिंगुरी विशाल आनंद यांच्याकडून जनतेला चांगल्या कामाची अपेक्षा आहे.ते कितपत यशस्वी ठरतात हे भविष्यात स्पष्ट होणार आहे.


## उष्माघात टाळण्यासाठी जनतेने आरोग्याची काळजी घ्यावी- जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**धुळे, दि. ३०- जिल्ह्यात आगामी दिवसामध्ये वाढत्या उन्हामुळे उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देवून आरोग्यांची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.**

धुळे जिल्हा हा उष्मालाट प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. वातावरणातील बदलामुळे विशेषतः उन्हाळी हंगामात वाढत्या तापमानामुळे मागील काही दिवसांपासुन (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,36,500 रु.+3% GST
सोने- 24 K -1,49,000 रु.+3% GST
चांदी- 2,42,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३






# लाकडाच्या मुळ्यांपासून बुध्द शिल्प

धुळे, दि.३०- शिंदखेडा तालुक्यातील शेवाडे येथील गणेश हायस्कूलमधील सेवानिवृत्त मुख्याध्यापकाने शिल्पकलेचा छंद जोपासत झाडांच्या मुळ्यांपासून भगवान गौतम बुध्दांच्या मुर्ती साकारण्याचा अनोखा उपक्रम हाती घेतला. झाडाच्या मुळ्यांपासून साकारण्यात आलेल्या बुध्द शिल्पातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



ग्रामीण भागात वाया गेलेले लाकडी खोड, झाडांच्या मुळ्या, फांदी यांचा उपयोग करून शिल्प बनवण्याचे कसब सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक अमृतसागर यांनी अवगत केले. कला क्षेत्रातील अखंड साधनेमुळे अमृतसागर यांना चारशेहुन अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. जागतिक विक्रम करण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. विश्वशांती दूत भगवान गौतम बुध्दांच्या साकारलेल्या झाडांच्या मुळ्यांपासून साकारलेल्या शिल्पातून अनुभुती येते. काष्टशिल्पाचा छंद जोपसणे हे देखील जिकरीचे काम आहे. फांद्या, मुळ्या जंगलासह रस्त्यांलगत निरिक्षण करून मिळवणे, शिल्प साकारतांना त्यातून अपेक्षित भाव निर्माण करणे ही खरी कला आहे. सेवानिवृत्त मुख्याध्यापक अमृतसागर यांच्या शिल्पकलेची राज्यातच नव्हे तर देशपातळीवर दखल घेतली गेली आहे.

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
**MEHBUB AMIR PINJARI**
AND MY NEW NAME IS
**MEHABUB AMIR PINJARI**
ADD- PLOT NO.176, WADJAI ROAD NEAR RAHEMAT MASJID KABIR GANJ TAL.DIST. DHULE-424001

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, संबंधितास, मिळकतीचे मुळ मालक, तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडेस या मिळकतींबाबत हक्क दाखविणाऱ्या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरुपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी उताऱ्यावरील मालक सौ.रत्नप्रभा राजेंद्र नेरकर रा.प्लॉट नं.२१, विकास कॉलनी, साक्री रोड, धुळे यांचे सोबत मौजे खेडे (आनंदखेडे) येथील गट नं.१९०/४/१ चे बिनशेती क्षेत्र ४२०० चौ.मी. वाणिज्य (हॉटेल) प्रयोजनार्थ बिनशेतीकडे वर्ग जागा मिळकत त्याची चतु:सिमा मंजुर नकाशा प्रमाणे व वापर वहिवाटी प्रमाणे आहे व राहील. सदर मिळकतीवर असलेले अभ्युदय को-ऑप बँक लि. शाखा कॅनडा कॉर्नर नाशिक यांचा कर्ज बोजे खरेदीखतापुर्वी भरुन, निल करून देण्याची जबाबदारी मालक यांची आहे व राहील.

अश्या मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा केलेला असून, आमचे पक्षकारांनी लिहून देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणुन देखील दिलेली असून, सौदा करुन घेतलेली आहे, आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर नोटीस ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आहे.

सबब सदर मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी हितसंबंध, तसेच विक्री अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, मृत्युपत्र, करार, कौटूंबिक तजवीज, हिंदु अन डिव्हायडेड फॅमिली, प्रतिमाळ, जप्ती, आरक्षण किवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश, स्थगिती आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि/अथवा स्वारस्थ असलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ठ असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था, किंवा व्यक्तींची असोसिएशन, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी, स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मांगणीच्या स्वरूपातील वर नमूद मिळकती/किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप असल्यास कृपया लेखी स्वरूपात पुष्टयर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आक्षेप/हरकती नोंदवाव्यात. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द केलेल्या तसेच कागदपत्राशिवाय आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन त्यांच्यावतीने आमचे मार्फत प्रसिध्द करण्यात येत आहे. कळावे ही जाहीर नोटीस, धुळे, दि.३०/०४/२०२६.

**ॲड.संतोष डी.ठाकूर**
कार्या.: शॉप नं.१ ते ४, ठाकूर कॉम्प्लेक्स जिल्हा परिषद रोड, स्टेट बँक मुख्य शाखेजवळ, एल.आयसीची बोळ, धुळे.
**मो.नं.९०९६०६७१८८**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे धुळे ५०४/२/अ/२/२ पैकी प्लॉट नं.१ चे एकूण क्षेत्र १५२८.६० चौ.मी. चा बखळ प्लॉट, यासी चर्तुसिमा मंजुर ले आऊट प्रमाणे, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट १) निधी विनीत कुमार रा.२९/१०३ ईस्टएंड अपार्टमेंट, न्यु अशोक नगर मेट्रो स्टेशन, मयुर विहार फेज१ एक्सटेंशन, दिल्ली पुर्वी दिल्ली, २) रचना मुकेश महंत रा.पारोळा रोड, कॉटन मार्केट जवळ, धुळे, ३) स्तुती उमेश सहानी, रा. घर नं.१-८-१००० मुद्रा-११५, पाण्याच्या टाकी जवळ, गणेश नगर, नांदेड यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, बखळ प्लॉट वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉट संबंधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहू बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दिनांक- ३०/०४/२०२६, स्थळ- धुळे.

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग.नं.४, भांडी बाजार, कांती कॉम्प्लेक्स शेजारी, धुळे.
**मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७**

## प्रवेश देणे आहे

आनंद सदन सोसायटी संचलित आनंद सदन कन्या छात्रालय आमोदे, ता.शिरपूर, जि.धुळे या बसतिगृहात सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात इ.५ वी ते इ.१० वी पर्यतच्या विध्यार्थिनीना खालील प्रवेश वर्गवारीनुसार देण्यात सुरूवात आहे.

| अ.क्र. | जात | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी.) | ११% |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | ७९% |
| ३ | विमुक्त व भटक्या जाती (व्ही.जे.एन.टी.) | ०८% |
| ४ | विशेष मागासवर्गीय (एस.बी.सी.) | ०२% |
| ५ | आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग (इ.बी.सि.) | २०% |

तरी वरील वर्गवारीतील ज्या विध्यार्थिनीना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी दिनांक- ०१/०६/२०२६ पर्यंत आनंद सदन कन्या छात्रालय आमोदे शिरपूर इथे संपर्क साधावा.

**श्रीमती जुली अल्फान्सो**
**अधिक्षिका**

## प्रवेश देणे आहे

विश्व मंडळ सेवाश्रम मुलांचे वसतिगृह आमोदे ता.शिरपूर, जि.धुळे वस्तीगृहातील सन २०२६-२७ या शै. वर्षात इ.५ वी ते १० वी पर्यंत विद्यार्थ्यांना खालील वर्गवारीनुसार प्रवेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जात | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी.) | ११% |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | ७९% |
| ३ | विमुक्त व भटक्या जाती (व्ही.जे.एन.टी.) | ०८% |
| ४ | विशेष मागासवर्गीय (एस.बी. सी.) | ०२% |
| ५ | आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग (इ.बी.सि.) | २०% |

तरी वरील वर्गवारीनुसार ज्या विध्यार्थिनीना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी दिनांक- ०१/०६/२०२६ पर्यंत विश्वमंडळ सेवाश्रम शिरपूर येथे संपर्क साधावा.

**श्री.गुणीलाल पावरा**
**अधिक्षक, विश्व मंडळ सेवाश्रम**
**आमोद ता.शिरपूर, जि.धुळे**

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील, नि.६
ॲड.व्ही.एस.पाटील

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.१४४/२०२६

१) कोमलसिंग लोटनसिंग गिरासे, २) भरतसिंग लोटन गिरासे,
३) जोतेसिंग लोटनसिंग गिरासे, ४) रामसिंग लोटन गिरासे,
१ ते ४ रा.मु.पो.जखाणे ता.शिंदखेडा, जि.धुळे
५) चित्रकलाबाई भगवानसिंग गिरासे, रा.मु.पो.निकुंभे ता.जि.धुळे,
६) अ) सुरेखाबाई नारायणसिंग गिरासे,
६) ब) कुणाल नारायण गिरासे, ६) क) गीतांजली नारायणसिंग गिरासे,
६अ ते ६क रा.मु.पो.जखाणे ता.शिंदखेडा, जि.धुळे ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.आनंदबाई लोटनसिंग गिरासे, मृत्यू दि.०४/०१/२०२६

ज्याअर्थी अर्जदार यांनी नामे कै.आनंदबाई लोटनसिंग गिरासे ह्या दि.०४/०१/२०२६ रोजी मयत झाल्यावर त्यांना अर्जदार नं.१) कोमलसिंग लोटनसिंग गिरासे अर्जदार न.२) भरतसिंग लोटन गिरासे अर्जदार न.३) जोतेसिंग लोटनसिंग गिरासे अर्जदार न.४) रामसिंग लोटन गिरासे हे मुले या नात्याने ५) चित्रकलाबाई भगवानसिंग गिरासे ही मुलगी या नात्याने अर्जदार न ६अ) सुरेखाबाई नारायणसिंग गिरासे सून या नात्याने अर्जदार न.६) ब) कुणाल नारायण गिरासे हा नातू या नात्याने व अर्जदार न.६) क) गीतांजली नारायणसिंग गिरासे नात नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. त्याअर्थी सदरहू मयतास अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे चे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.११/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार परागंदाचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.२८/०४/२०२६

आदेशावरून
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील, नि.६
ॲड.व्ही.एस.पाटील

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.१३३/२०२६

१) श्री.अनिल नारायण पवार, रा.मु.पो. रूम नं.२०१ सनय पार्क, अमरदीप बिल्डींग समोर कॅम्प नं.४ संभाजी चौक उल्हासनगर ता. जि. ठाणे
२) श्री.नंदकुमार नारायण पवार, रा.मु.पो. रूम नं.२०३, ठक्कर प्लाझा को-ऑप हौसिंग सोसायटी कर्जत रोड धन्वंतरी हॉस्पिटल जवळ कुळगाव बदलापूर ईडी ठाणे
३) श्री.परेशकुमार नारायण पवार, रा. मु.पो. प्लॉट नं.५४ शिवनेरी कॉलनी जि टी पी स्टोप रोड सरस्वती मंगल कार्यालय मागे देवपूर धुळे ता.जि.धुळे
४) विजया रविंद्र पाटील, रा.मु.पो. बी-६ अशेना पाडा सेक्टर २९ आनंद नगर उल्हासनगर ४ ता.उल्हासनगर जि.ठाणे
५) सुजाता दिनकर पाटील, रा. मु.पो. बाजार पेठ थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.नारायण तानका पवार, मृत्यू दि.२६/०८/२००७

ज्याअर्थी अर्जदार यानी कै.नारायण तानका पवार हे दि.२६/०८/२००७ रोजी मौजे पाटण ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झालेले आहे. कै.नारायण तानका पवार हे मयत झाल्यानंतर अर्जदार नं.१ अनिल नारायण पवार अर्जदार नं.२ नंदकुमार नारायण पवार अर्जदार नं.३ परेशकुमार नारायण पवार हे मुले ह्या नात्याने अर्जदार नं.४ विजया रविंद्र पाटील अर्जदार नं.५ सुजाता दिनकर पाटील ह्या मुली ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.९/६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.२८/०४/२०२६

आदेशावरून
(कामगिरी कारकून)
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील, नि.६
ॲड.व्ही.एस.पाटील

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.१४२/२०२६

१) सुरेखाबाई नारायणसिंग गिरासे, २) कुणाल नारायण गिरासे,
३) गीतांजली नारायणसिंग गिरासे,
१ ते ३ रा.मु.पो.जखाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.नारायणसिंग लोटनसिंग गिरासे, मृत्यू दि.२३/१२/२०२२

ज्याअर्थी अर्जदार यांनी नामे ) कै.नारायणसिंग लोटनसिंग गिरासे हे दि.२३/१२/२०२२ रोजी मयत झाल्यावर त्यांना अर्जदार नं.१) सुरेखाबाई नारायणसिंग गिरासे पत्नी या नात्याने अर्जदार न.२) कुणाल नारायण गिरासे हा मुलगा या नात्याने व अर्जदार न.३) गीतांजली नारायणसिंग गिरासे मुलगी नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. त्याअर्थी सदरहू मयतास अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे चे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.११/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार परागंदाचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.२८/०४/२०२६

आदेशावरून
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे

## जाहीर नोटीस

ॲड.निखिल रविंद्र भावसार
निशाणी नं.६

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं.९१/२०२६

भटू खंडू सोनवणे वै. ....अर्जदार
विरूध्द
कै.सिंधुबाई बंसी (बंन्सी) सोनवणे (मयत) ....मयत

ज्याअर्थी की, अर्जदार नं.१ भटु खंडु सोनवणे हा कै.सिंधुबाई बंसी (बन्सी) सोनवणे यांचा पुतण्या आहे तर अर्जदार नं.२ केसरबाई विठठल शिरसाठ ही कै.सिंधुबाई बंसी (बन्सी) सोनवणे यांची पुतणी आहे तर हा कै. सिंधुबाई बंसी (बन्सी) सोनवणे हयांचे दि.१०/३/२०२२ रोजी मौजे सतारे ता.शिंदखेडा जि.धुळे येथे निधन झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय कामांसाठी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि.०५/०५/२०२६ मे.कोर्टात चौकशी कामी नेमलेले आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वत:किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
स्थळ- शिंदखेडा, दिनांक- २८/०४/२०२६

## जाहीर नोटीस

प्रति,
तमाम जनतेस
तसेच वित्तीय संस्था, बँका. खाजगी सावकार, परवानाधारक सावकार यांना......

श्री.सुनिल भटूलाल बाफना, जयेश नरेशकुमार जैन, करिष्मा नरेशकुमार जैन, हेमका नरेशकुमार जैन, सर्व रा.नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे यांचे कडून त्यांनी दिलेल्या माहिती व सुचनेनुसार जाहिर नोटीस देण्यात येते ते खालील प्रमाणे-

मौजे पिंप्राड ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शेतगट नं.२६२/१/१/ब क्षेत्र ०० हे. ८० आर आकार ०७ रु.१५ पैसे ही जमीन आमच्या मालकीची व ताबे उपभागातील आहे. सदर मिळकत शेक गुलाम साबीर शेक अबदुल्ला, शेक अख्तार शेक अबदुल्ला याचे कडुन दुय्यम निबंधक साहेब शिंदखेडा यांच्या कडे रजिस्टर दस्त नोंदवून विकत घेतला असून आपचे ताब्यात व उपभोगात आहे. या कामी आम्ही वकीलांकडून टायटल वेरीफिकेशन साठी मागणी केली आहे व सदर मिळकत आमचे ताब्यात कायदेशीर रित्या ताब्यात आली असल्याचे कागदपत्र, खरेदीखत दिलेले आहेत. त्यांचेसाठी अधिक स्पष्टता व्हावी म्हणून सदरची नाटीस देण्यात येत आहे.

उपरोक्त मिळकतीवर कोणाचा टाच, बोजा, कर्ज, हक्क, वहिवाट, असल्यास खालील पत्यावर ७ दिवसाचे आत लेखी स्वरुपात रजिष्टर पोस्टाने कळवावे अन्यथा या मुदतीनंतर वर नमूद आमचे पक्षकार यांना क्लीयर टायटल वेरीफिकेशन देण्यात येईलण मग नंतर कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही, परस्पर वृत्तपत्रातून हरकत घेवू नये. ती मान्य राहणार नाही. यांची नोद घ्यावी. दि.३०/०४/२०२६.

**ॲड.वसंतराव आनंदराव पवार**
गांधी चौक, पाटील वाडा, शिंदखेडा, जि.धुळे.
**मो.नं.९४२३२३७२५६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना, सर्व बॅक, वित्तीय संस्था, पतसंस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय वगैरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे हिंगणी ता.शहादा जि.नंदुरबार येथील गट नं.१७/१ पैकी पश्चिमेकडील निम्मे क्षेत्र हे. २ आर. ०० यांसी चर्तुसिमा-
पुर्व- गट नं.१७/१ चे निम्मे क्षेत्र, पश्चिम- गट नं.१६,
दक्षिण- गट नं.११ व १८, उत्तर- गट नं.२३.

येणेप्रमाणे वर नमूद केलेली शेतमिळकत अशोक निमजी पाटील, जगदिश बाबु पाटील व विजय रतिलाल पाटील यांच्या सामाईक मालकीची व प्रत्यक्ष कब्जेउपभोगातील आहे. ही शेतमिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे या शेतमिळकतीच्या मालकांनी सांगून या शेतमिळकतीचा विक्रिचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर केला आहे व या सौद्याप्रमाणे आमचे अशिल सदर शेतमिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

तरी उपरोक्त शेतमिळकतीवर ज्या कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, हितसंबंध खरेदी, विकी, करार, मोबदला खत, गहाण, दान, बक्षीस, तारण, जप्ती, जामीनकी, कोर्ट कार्यवाही, टाच, अगर अन्य प्रकारचा बोजा सौद्या पावती, करारनामा, मुखत्यारनामा, भाडेकरार वारसा हक्क, वाटणी हक्क, आरक्षण, अन्न वस्त्राचा हक्क वगैरे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आंत लेखी व मुळ कागदपत्रांसह आमचेकडे हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास उपरोक्त शेतमिळकत निर्वेध व निर्बोज आहे . असे समजून आमचे अशिल या शेतमिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व अधिकारावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. दि.२९/०४/२०२६.

**ॲड.योगेश डी.अग्रवाल,** शिरपूर, जि.धुळे.

## जाहीर नोटीस

प्रति,
तमाम जनतेस
तसेच वित्तीय संस्था, बँका, खाजगी सावकार, परवानाधारक सावकार यांना....

श्री.गिरीष विजयकुमार शाह रा.नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे यांचे कडून त्यांनी दिलेल्या माहिती व सुचनेनुसार जाहिर नोटीस देण्यात येते ते खालील प्रमाणे-

मौजे माळीच ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शेतगट नं.८१/२ क्षेत्र १ हे. ५८ आर आकार ०६ रु.०५ पैसे या जमीनीपैकी दक्षिणेकडील क्षेत्र ० हे ६० आर जमीनीचा सौदा आमचे वर नमूद पक्षकार यांनी शेतजमीन मालक श्री सुनिल रावण देसले रा. माळीच यांच्याशी केला असून, त्यांना बयाणा रक्कम दिलेली आहे. व त्यांनी आमचे पक्षकाराचे हितात सौदापावती लेख लिहुन दिलेला आहे.

उपरोक्त मिळकतीवर कोणाचा टाच, बोजा, कर्ज, हक्क, वहिवाट, असल्यास खालील पत्यावर ५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात रजिष्टर पोस्टाने कळवावे अन्यथा या मुदतीनंतर आमचे पक्षकार शेतजमीनीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग नंतर कोणाचीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही, परस्पर वृत्तपत्रातून हरकत घेवु नये. ती मान्य राहणार नाही. यांची नोद घ्यावी.

दि.३०/०४/२०२६.

**ॲड.वसंतराव आनंदराव पवार**
गांधी चौक, पाटील वाडा, शिंदखेडा, जि.धुळे.
**मो.नं.९४२३२३७२५६**

## जाहीर नोटीस

### धुळे येथील मे. 2nd Jt सिव्हिल जज्ज सो. सिनि. डिव्ही. यांचे कोर्टात


दि.कि.अर्ज नं.३४२/२०२५
नि.क्रं.६

१) सोमनाथ झुलाल माळी, २) ज्ञानेश्वर झुलाल माळी,
३) मंगलाबाई रमेश माळी,
रा.सोनगीर ता.जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.इंदुबाई झुलाल माळी, मृत्यू दिनांक- १८/०१/२०२६,
मृत्यू ठिकाण सोनगीर, ता.जि.धुळे ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नंबर न.१ ते ३ हे मयत कै.इंदुबाई झुलाल माळी यांचे वर अर्जदार हे मुलगा व मुलगी असे कायदेशीर वारस म्हणून, अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम १८२७ सेक्सन २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्या अर्थी या नोटीससिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे या अर्जदार न.१ ते ३ यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत. अगर दि.०९/६/२०२६ रोजी ठीक १०:३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार न.१ ते ३ यांच्या तोंडी पुरावा घेऊन त्या आधारे मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार न.१ ते ३ यांनी केलेल्या मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर धुळे यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिले असे.

आदेशावरून
सही
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालया, धुळे
शिक्का
सही
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालया, धुळे



पान १ वरुन

## विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध

एक आमदारासाठी २८ मतांचा कोटा

विधान परिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच भाजप, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या इच्छुक उमेदवारांची नाव समोर आली आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला सहा, शिवसेना दोन, राष्ट्रवादी एक आणि महाविकास आघाडी एक जागा येणार आहे. विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीत भाजप (१३१आमदार), एकनाथ शिंदे यांची शिवसेना (५७ आमदार) आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी (४० आमदार) असे बलाबल पाहता महायुतीचे आठ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ आहे. त्यामुळे त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज निवडून येऊ शकतो.

कार्यकाळ संपणारे आमदार

कार्यकाळ संपणाऱ्या आमदारांमध्ये उद्धव ठाकरे (शिवसेना उबाठा), नीलम गोऱ्हे (शिवसेना), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी शरद पवार गट), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी अजित पवार गट), गोपीचंद पडळकर (भाजप), रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप), राजेश राठोड (काँग्रेस), प्रवीण दटके (भाजप), रमेश कराड (भाजप). पोटनिवडणूक - प्रज्ञा सावंत.

## धार मध्ये पिकअप-स्कॉपिओ अपघात

लहान मुले आणि महिलांचाही समावेश आहे. सध्या रुग्णालयात डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वाहनांची जोरदार धडक ही घटना तिरला पोलीस ठाणे हद्दीतील चिकलिया येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ रात्री साडेआठच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, एका पिकअप वाहनात क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे शेहचाळीस मजूर बसले होते. यामध्ये महिला आणि मुलांचाही समावेश होता. अचानक पिकअप अनियंत्रित होऊन रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उलटली. त्याच वेळी समोरून येणाऱ्या वेगवान स्कॉर्पिओने पिकअपला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की पिकअपचा चक्काचूर झाला आणि त्यातील मजूर रस्त्यावर इतरत्र फेकले गेले.

अंधारात मजुरांचा आक्रोश ऐकून जवळचे लोक आणि पेट्रोल पंप कर्मचारी मदतीसाठी धावून आले. या अपघातात बारा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर रात्री उशिरापर्यंत मृतांची संख्या सोळा झाली. पंचवीसहून अधिक लोक अजूनही जखमी असून त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती पाहता मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती डॉक्टर छत्रपाल सिंह यांनी व्यक्त केली आहे.

अनेक मजुरांची प्रकृती चिंताजनक

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, अद्याप दहापेक्षा अधिक मजुरांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. प्राथमिक उपचारानंतर काही जखमींना इंदूरला पाठवण्यात आले आहे. अचानक मोठया संख्येने रुग्ण आल्यामुळे रुग्णालय प्रशासनाची धावपळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय ताफा घटनास्थळी व रुग्णालयात पोहोचला. तिरला पोलीस ठाण्याने तपास सुरू केला आहे.

## मो.सायकलची धडक पादचारी महिला ठार

सीडी-३५४४ घेवून भरधाव वेगाने जात असतांना रस्त्याच्या बाजुने चालणाऱ्या उषा सत्तारसिंग राजपूत गिरासे (वय ५०) यांना जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात पायी चालणाऱ्या उषा राजपूत यांचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला मयुर राजपूत विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उष्माघात टाळण्यासाठी जनतेने ...

वातावरणातील बदलामुळे मोठया प्रमाणात तापमानात वाढ झाल्याचे दिसुन येत आहे. जिल्ह्यातील तापमानात ही वाढ मे २०२६ चे अखेरपर्यंत राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभुमीवर नागरीकांनी आरोग्याची विषेश काळजी घेणे आवश्यक आहे. उष्मालाटेमुळे उष्माघातामुळे मानव, पशु- पक्षी व शेती पिकांवर विविध दुष्परिणाम उद्भवतात. म्हणुन नागरीकांनी आरोग्याची/ उष्माघातापासून बचावासाठी काळजी घेण्यात यावी.

पान १ वरुन

## पालकमंत्र्यांकडे कचऱ्याची समस्या

तेव्हा महाराष्ट्र दिनी आम्ही हा कचरा पालक मंत्र्यांकडे सोपविणार आहोत, असे शिवसेनेतर्फे प्रसिध्दी देण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे.

शिवसेना महानगरप्रमुख धीरज पाटील यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, कचऱ्यामुळे धुळेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छता निरीक्षकांकडून कचरा गोळा केला जातो. पण, ठेकेदार वाहनांच्या अभावी हा कचरा उचलत नसल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आहेत. स्वच्छता निरीक्षकांच्या कचरा ठेकेदारासंदर्भात असंख्य तक्रारी उपायुक्तांकडे आहेत. ठेकेदार दंडात्मक कारवाईस जुमानत नाही. दंड भरत नाही. ठेकेदार आयुक्तांच्या आदेशाला देखील जुमानत नसल्याने आयुक्तांनी केलेल्या दंडात्मक कारवाईला तो भिक घालत नसल्याचे दिसून आले आहे. या संदर्भात शिवसेनेने कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची ठिकाणी लक्षात आणून देण्यात आली. पण, कचऱ्याची समस्या जैसे थे आहे. त्यामुळे महाराष्ट्र दिनानिमित्त धुळे शहरातील कचरा गोळा करून तो प्लास्टिकच्या कॅरीबॅग मध्ये आकर्षकरीत्या पॅक करून पालकमंत्री जयकुमार रावल यांना भेट देण्यात येईल. युद्ध पातळीवर शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन करून धुळेकरांचे आरोग्य अबाधित राहावे यासाठी प्रयतक करावेत, अशा आशयाचे निवेदन आज महापालिका प्रशासनास देण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, अण्णा फुलपगारे, संदीप सूर्यवंशी, शिवाजी शिरसाळे, कपिल लिंगायत ,गोकुळ बडगुजर सचिन शिंदे, योगेश पाटील उपस्थित होते.

## क्रीडा, युवा पुरस्काराचे आज वितरण

स्मृतिचिन्ह, युवक व युती करिता रोख १० हजार व संस्थेकरिता रोख ५० हजार असे आहे. दोन्ही पुरस्काराकरिता कार्यालयामार्फत प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्रस्तावांची जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समिती तसेच जिल्हा युवा पुरस्कार निवड समितीने प्रस्तावांची छाननी करुन ही निवड केली आहे.

**जिल्हा क्रीडा पुरस्कार**

सन २०२५-२०२६ साठी जिल्हा गुणवंत खेळाडू पुरस्कार हेमांशु राजेंद्र पाटील यांना रायफल शुटींग खेळात जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा गुणवंत खेळाडू पुरस्कार मनिषा हिरालाल माळी कायकिंग व कॅनोइंग या खेळात, जिल्हा गुणवंत दिव्यांग खेळाडू कु.दर्शना राजेंद्र गवते यांना रायफल शुटींग, जिल्हा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार उमेश गोरख येरडावकर यांना ज्युदो खेळासाठी जाहीर झाला आहे.

**जिल्हा युवा पुरस्कार**

सन २०२५-२०२६ वर्षासाठी जिल्हा युवा पुरस्कार भुषण संजय पाटील, तसेच जिल्हा युवा पुरस्कार प्रेरणा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नगावबारी, धुळे चेतन पाटोळे यांना जाहीर झाला आहे. या दोन्ही पुरस्काराचे वितरण शुक्रवार, १ मे २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता पोलीस कवायत मैदान, धुळे येथे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह रोख पारितोषिक देवून सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, उपसंचालक क्रीडा व युवक सेवा,नाशिक श्रीमती स्नेहल साळुंखे, जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील, जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समिती व जिल्हा क्रीडा कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व क्रीडा क्षेत्रातील सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत. यापुरस्कार वितरण सोहळ्यामुळे शहर आणि जिल्ह्यातील उद्योन्मुख खेळाडुंना प्रेरणा मिळेल. शासनाच्या निरनिराळ्या योजनांचा लाभ घेत खेळाडूंनी प्रगती करावी असा संदेश या कार्यक्रमाचा आहे

पान १ वरुन

## भाजीपाला मार्केटचे आज भूमिपूजन

निर्णय त्यांनी घेतला. त्यानुसार सर्व व्यावसायिकांना विश्वासात घेऊन नूतनीकरणाचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी चारही मार्केट मिळून सुमारे ५५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सध्या या परिसरात सुमारे ३०० ते ३५० व्यावसायिक व्यवसाय करत असून, नव्या मार्केटमध्ये सुमारे साडेपाचशे (५५०) व्यावसायिकांसाठी गाळे उपलब्ध होणार आहेत. याशिवाय भाजीपाला व फळ विक्रेत्यांसाठी सुमारे ३०० ओटे निर्माण करण्यात येणार आहेत. कार्यक्रमासाठी महापौर मायादेवी परदेशी, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती महिला लताबाई सोनार, बालकल्याण सभापती ठाकरे, गटनेत्या किरण कुलेवार, प्रतोद भगवान गवळी यांच्यासह नगरसेवक उपस्थित राहणार आहेत

चेनी रोड व परिसरात सध्या रस्त्यावर भाजीपाला व फळ विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना नव्या मार्केटमध्ये प्राधान्याने जागा देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, आधीपासून येथे व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, त्यानंतर इतरांना संधी दिली जाणार आहे. या प्रकल्पामुळे व्यापाऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज सुविधा मिळणार असून शहरातील वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धुळे शहर अतिक्रमणमुक्त करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

कार्यक्रमास उपस्थितीचे आवाहन स्थानिक नगरसेवक कल्पना सुनील महाले, नगरसेवक रोहित चांदोडे, नगरसेवक चेतन गवळी यांनी केले आहे

## पाठीशी हिमालयासारखा- मंत्री मुश्रीफ

अथक प्रयत्न करू. जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी आधुनिक व प्रगत महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले होते. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर त्यांची गाठ श्रद्धा होती. त्यांच्या पुरोगामी विचारांवरील श्रद्धेतूनच नामदार हसरसाहेब मुश्रीफ यांनी महाराष्ट्राचा टोकाचा जिल्हा असलेल्या नंदुरबार जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी समर्थपणे घेतली आहे.

हक्काच्या पाण्यासाठी आग्रही

मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, नर्मदा प्रकल्पांतर्गत अजूनही या विभागाच्या वाट्याचे हक्काचे दहा टी. एम. सी. पाणी उचललेले नाही. यापुढे ते दहा टी. एम. सी. पाणी या विभागाला देण्यासाठी व येथे हरितक्रांती फुलवण्यासाठी मी ऑटोकाट प्रयत्न करीन. शासन दरबारी त्याचा मनापासून पाठपुरावा करीन.

यावेळी नंदुरबार जिल्ह्यातील नूतन नगराध्यक्ष, नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सत्कार मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते झाला.

यावेळी पक्षप्रवक्त्या प्रतिभा शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष भरत गावित, माजी सभापती रतन पाडवी, माजी जिल्हा परिषद सदस्य मोहन शेवाळे, नवापूरचे नगराध्यक्ष जयवंत जाधव, तळोदाच्या नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी, नवापूरचे उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, महिला जिल्हाध्यक्षा सौ. सीमा सोनगिरे, युवक जिल्हाध्यक्ष सिताराम पावरा, मधुकर पाटील, नगरसेवक मोंटू जैन, मालतीताई वळवी, जेलसिंग पाडवी, योगेशभाऊ चौधरी, संगीताताई शिंपी, शितलताई पाडवी, जाकिरमिया जहांगीरदार, पप्पूभाऊ कुरेशी, अविनाश गावित यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविकपर भाषण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे यांनी केले.

पान १ वरुन

## महानिर्मितीचे संच एकापाठोपाठ एक बंद

अचानक वाढल्यास राज्यातील वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

औष्णिक प्रकल्पांतून सर्वाधिक वीजनिर्मिती

राज्यातील एकूण मागणीपैकी सुमारे १८ हजार १२० मेगावॅट वीजनिर्मिती महाराष्ट्रात होत आहे. त्यापैकी सर्वाधिक सात हजार ४३७ मेगावॅट उत्पादन महानिर्मितीकडून होत आहे. यामध्ये औष्णिक प्रकल्पांतून सहा हजार ३२१, मेगावॅट, उरण गॅस प्रकल्पातून २६८ मेगावॅट, कोयना जलविद्युत प्रकल्पातून ४४८ मेगावॅट आणि सौर ऊर्जेतून ७६ मेगावॅट वीजनिर्मितीचा समावेश आहे. खासगी क्षेत्रात जिंदल (९१०), अदानी (२,०७७), आयडियल (२३३), रतन इंडिया (१,३०७), बुटीबोरी (५६७) आणि एसडब्ल्यूपीजीएल (३०४ मेगावॅट) यांचे योगदान आहे. तसेच केंद्राच्या वाट्यातून राज्याला १२ हजार १४६ मेगावॅट वीज उपलब्ध होत आहे.

## दुष्काळमुक्तीचा उपाय राबवण्याचे श्रेय..

ही जलयात्रा काढून केली जात आहे अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या त्र्यंबकेश्वर ते महेश्वर या जलयात्रेचे २९ एप्रिलला शिरपुरात स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. आमदार गोपीचंद पडळकर, खासदार रामराव वडकुळे, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपचे नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.तुषार रंधे, विनायक देशमुख, डॉ.पंकज भिडे, उपनगराध्यक्षा संगीता देवरे, अरुण धोबी उपस्थित होते. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थितांशी थेट संवाद साधत शिरपुर तालुक्यातील सिंचनाशी संबंधित विविध प्रश्नांचा चर्चा केली. तसेच माजीमंत्री आ. अमरीशभाई पटेल यांनी केलेल्या सिंचनाचा केलेल्या कामाचे आदर्श घेत महाराष्ट्रात शासनाने जलयुक्त शिवार योजना सुरू केली म्हणून अमरीशभाईचे केलेल्या कार्याचे कौतुक केले. सिंचनाच्या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाकडून पूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच जलसंवर्धन, सुयोग्य पाणी व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस पावले उचलून ग्रामीण विकासाला गती देण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. आ. गोपीचंद पडळकर यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व सुत्रसंचलन बबनराव चौधरी यांनी केले. शिरपूर येथून जलयात्रा मध्यप्रदेश येथील क्षेत्र महेश्वरकडे पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली.

## जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण दत्त.एस यांची बदली

खुन, घरफोडया, राजकीय वाद, चोऱ्यांचे प्रमाण प्रचंड वाढले. त्यामुळे जनमानसात त्यांच्या बाबत नाराजी पसरली होती. राजकीय नेत्यांशी पोलिस विभागाचे संबंध बिघडले होते.याबाबत आमदार चंद्रकांत रघूवंशी यांनी पोलिस विभाच्या विरोधात विधान परीषदेच्या अधिवेशनात लक्ष्यवेधी मांडली.त्यात डी वायएसपी,गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिस अधिकाऱ्यांच्या तपास कामांवर संशय व्यक्त करीत बदलीची मागणी केली होती. आदिवासी युवक व अन्य युवकांना हदद्पार केल्याने आदिवासी भागातही त्यांच्या विरोधात रोष पसरला होता. जय वळवी च्या खुनानंतर नंदुरबारच्या इतिहासात प्रथमच जिल्हाधिकारी ,एसपी कार्यालयावर दगडफेक करण्याच्या घटना घडल्या होत्या.

✻ धुळे - वीज वितरण कंपनी नागरिकांच्या समस्या लक्षात घेत नसल्याने नागरिकांचा उद्रेक झाला. देवपूरातील तुळशिराम नगर परिसरात असलेल्या वीज उपकेंद्रात दखल घेण्यासाठी कोणी नसल्याने संतप्त नागरिकांनी तोडफोड केली.


**पाहिजे**
कंम्पाऊंडर, नर्स, साफसफाईसाठी मुलगा लावणे आहे.
डॉ.आनंद गिंदोडीया
डॉ.माधवी गिंदोडीया
श्री धन्वंतरी हॉस्पिटल, गल्ली नं.४, महात्माजी हॉटेल समोर, धुळे
9112159675

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हुशार व होतकरु मुले अर्जंट पाहिजेत.
अनमोल पुस्तकालय
फुलवाला चौक, आग्रारोड,धुळे

**पाहिजेत**
टॅली ऑपरेटर पाहिजे.
फुल टाईम, पार्ट टाईम
समक्ष भेटावे.
वेळ – ४ ते ६
लक्ष्मी ट्रेडर्स
८०फुट रोड, कनोसा कॉन्व्हेन्ट समोर, धुळे
9422787606

**बंगला भाड्याने देणे**
सर्व सोयीयुक्त बंगला ४ व्हीलर पार्कींग, २४ तास पाणी, गार्डन, रोडटच, भरत नगर देवपुर, धुळे
-: संपर्क :-
9011237323
9421617354

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

**पाहिजे**
चहा पावडर वाटपासाठी माणुस पाहिजे.
शिक्षण – पदवीधर
वय–२५–३० वर्षे
– कामाची वेळ –
सकाळी ५:३० ते दुपारी ११:३० वाजेपर्यंत
पगार – १२००० रु. महिना
तुषार.एच.चोरडिया
भगा मोहन नगर, प्लॉट नं.११, नटराज टॉकी मागे खिशान पेट्रोल पंपाजवळ, धुळे
-: संपर्क :-
8208053452

**पाहिजे**
१) पेट्रोल पंपावर कामासाठी अनुभवी मॅनेजर लावणे आहे.
जागा -१
२) पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी मुले व मुली लावणे आहे.
जागा -४
-: संपर्क :-
9823210266

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणुस पाहिजेत.
१ ऑफसेट मशीनसाठी ऑपरेटर, १ बाईंडर
२ ग्रफिक्स् डिझायनर
२ ऑफिस बॉय व हेल्पर
त्वरीत लावणे आहे.
समक्ष भेटा
नहुष डिजिटल धुळे
-: संपर्क :-
9028921347
8788942027

**पाहिजे**
कॉम्प्युटर शॉपसाठी ऑफीस बॉय पाहिजे.
दहावी–बारावी पास.
नितीन कॉम्प्युटर
देवपुर, धुळे, पंचवटी टॉवर
9823134220

**पाहिजेत**
धुळे एस टी स्टँडवरील पे अँड पार्किंगसाठी बिलिंग मशीन ऑपरेटर, व दुचाकी वाहने लावण्यासाठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजेत. आकर्षक पगार
-: संपर्क :-
9172676376

**Wanted**
2 Pharmacist Want (Medical Shop)
& 1 Helper
9823833108

**पाहिजे**
दुकानात कामासाठी कामाची गरज असलेले कायमस्वरुपी मुले पाहिजे आहेत.
-: संपर्क :-
9011187379
9823147877

**पाहिजेत**
परिवार (Parivar) ब्रँडच्या खाद्यतेल आणि सोया वडी उत्पादक कंपनीला खालील कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.
पॅकिंग मशीन ऑपरेटर
इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज (बायो–डेटासह) ३ दिवसांच्या आत खालील ईमेल आयडीवर पाठवावेत.
ईमेल आयडी :– hr@deesan.com
personnel@deesan.com
whatsapp :- +918411818525
पत्ता :– Deesan Agro Tech Pvt Ltd. A-1/2, MIDC,Dhule -424006
फोन क्रमांक :– 02562- 288927, 288919



# हार्दिक अभिष्टचिंतन

आमचे प्रेरणास्थान मार्गदर्शक





जनसामान्यांच्या जिवनाला
दिशा देणारा दिपस्तंभ,
राजकारणातील अभ्यासक,
विचारांचे आमचे श्रध्दास्थान
मा. एन. सी. आबा पाटील
यांना आज वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**मा. एन. सी. आबा पाटील**
(संस्थापक अध्यक्ष, श्री देवपूर विधायक समिती)
(उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.गट) मुंबई)
(अध्यक्ष, शिंदखेडा तालुका पाणी विकास मंच)
(अध्यक्ष शिंदखेडा तालुका खाजगी शैक्षणिक संस्था)

✻ शुभेच्छुक ✻

**श्री. देवपूर विधायक समिती संचलित**

**सितामाई प्राथमिक विद्यामंदीर वाडीभोकर रोड, देवपुर, धुळे.**

| | |
|---|---|
| श्री. सी.ए. पाटील ( उपशिक्षक ) | श्रीमती एस.एम. मारनोर (प्र.मुख्याध्यापिका) |
| | श्रीमती आर. एफ. परदेशी (उपशिक्षिका) |

**श्री गुरुदत्त खाजगी प्राथमिक विद्यामंदिर, वरुळ घुसरे ता.शिंदखेडा जि.धुळे**

| | |
|---|---|
| श्री.आर.जी.पाटील (मुख्याध्यापक) | श्री.टी.आर. चव्हाण (उपशिक्षक) |

**न्यु इंग्लिश स्कूल, वाडीभोकररोड, देवपूर, धुळे**

| | |
|---|---|
| श्री.एस.के.पाटील (मुख्याध्यापक) | श्रीमती एस.एन.पाटील (उपशिक्षिका) |
| श्री.एस.पी. बोरसे (शिपाई) | श्री.आर.जी. देसले (शिपाई) |

**श्री गुरुदत्त माध्यमिक विद्यालय, वरुळ घुसरे ता.शिंदखेडा जि.धुळे**

| | |
|---|---|
| श्री.ए.बी.करंकाळ (मुख्याध्यापक) | श्री.एम.व्ही. पाटील (उपशिक्षक) |
| श्री.जी.एन.पाटील (उपशिक्षक) | श्री.पी.जी. वाघ (उपशिक्षक) |
| श्री.के.एच. पाटील (उपशिक्षक) | श्री.जे.बी. पाटील (शिपाई) |
| श्री.एम.ए. देसले (शिपाई) | श्री.व्ही.एस.पाटील (शिपाई) |

**श्री देवपूर विधायक समिती अंतर्गत एन.सी.आबा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ डी ॲण्ड बी फार्मसी व डी.टी.एड. कॉलेज कर्मचारी वृंद**

| | |
|---|---|
| श्री.सुनिल नानाभाऊ मोरे (प्राचार्य) | डॉ.नितीन शिरुळे (प्राचार्य) |
| श्री.रिव्यांशू बैसाणे (प्राध्यापक) | श्री.अनस पिंजारी (प्राध्यापक) |
| श्री.जुनेद पिंजारी (प्राध्यापक) | श्री.देविदास सनेर (ओ.एस.) |
| श्रीमती गारगी महेंद्र साळुंखे | श्रीमती योगिनी हेमकांत विसपुते |
| श्री.अनिल पाटील (प्राध्यापक) | श्री.प्रा.पवन पाटील |



# आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...

atomberg "Why not?"





**क्या आप जानते हैं**

**इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?**

इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.

एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.

इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.

ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.

इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !

SAVES UP TO ₹1500 IN A YEAR

100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

District Distributor **श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.**

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०